पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २२

**सभावृत्तांत**

दिनांक - **०३/०४/२०१८** वेळ – दुपारी **०३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा मंगळवार दिनांक **०३/०४/२०१८** रोजी दुपारी **०३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.सुनिता हेमंत तापकीर - सभापती**
२. मा.योगीता ज्ञानेश्वर नागरगोजे - उपसभापती
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
५. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे
६. मा.लोखंडे चंदा राजू
७. मा.सुलक्षणा राजू धर
८. मा.कदम निकीता अर्जुन
९. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.झगडे – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.डॉ.डांगे – महिला वैद्यकीय अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र.१) बालवाडीतील विद्यार्थ्यांना स्वच्छता कीटचे दर सहा महिन्यांनी वाटप करणेबाबत – मा.सागर आंगोळकर, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२) चार चाकी महिला प्रशिक्षण LMV-TR देणेबाबत – मा.योगिता नागरगोजे, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड मनपाच्या सर्व बालवाडी वर्गात भिंतींना डिजीटल चित्रमय करुन देणेबाबत – मा.चंदा लोखंडे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) आभ्यास दौरा आयोजित करणेबाबत – मा.योगिता नागरगोजे व मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड महानगरपालिका, लाभार्थी महिला व महिला बचत गटांना सोयी सुविधांबाबत – मा.सोनाली गव्हाणे, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक २०/०३/२०१८ व २१/०३/२०१८ रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक २१)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - ०३/०४/२०१८

सुचक : मा.सागर आंगोळकर अनुमोदक : मा.योगिता नागरगोजे

संदर्भ : मा.सागर आंगोळकर, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरातील बालवाडयांना स्वच्छता कीट दर सहा वाटप करण्यास मान्यता देणेत येत आहे. जेणेकरुन बालवाडयांतील मुलांच्या आरोग्याच्या स्वच्छतेसाठी जास्तीत जास्त उपयोग होऊन बालवाडीमध्ये येणा-या मुलांचे प्रमाण वाढेल. तसेच प्रत्येक प्रभागात बाल आनंद मेळावा घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४० विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०३/०४/२०१८

सुचक : मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

संदर्भ : मा.योगिता नागरगोजे, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव –

चार चाकी वाहन महिला प्रशिक्षणासाठी करणेत आलेल्या करारनाम्यामध्ये दुरुस्ती करणेस व महिलांचे LLR लायसेन्स झाल्यानंतर सुरु होणा-या प्रशिक्षणासाठी Permnent Licence Test सदर संस्थेस 75% Advance देणेस व LLR च्या पुराव्यानुसार व सदर महिलांचे प्रशिक्षण व Permnent Licence पुर्ण झाल्यानंतर त्या लाभार्थ्यांचा RTO Licence information च्या आधारे त्यांना उर्वरित 25% रक्कम सदर Permnent Licence हे पोष्टाने जात असून ते हातात मिळत नसल्याने RTO मधील Licence information वर त्यांना बील अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४१ विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०३/०४/२०१८

सुचक : मा.चंदा लोखंडे अनुमोदक : मा. योगिता नागरगोजे

संदर्भ : मा.चंदा लोखंडे, मा.योगिता नागरगोजे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील मनपाच्या सर्व बालवाडी वर्गामधील भिंतींना पशु, पक्षी, प्राणी, फुलझाडे, इ.चित्रे वर्गामध्ये भिंतीवर डिजीटल रंगित (छायाचित्र) करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४२ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०३/०४/२०१८

सुचक : मा.योगिता नागरगोजे अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ : मा.योगिता नागरगोजे, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

केरळ येथे आभ्यास दौरा आयोजित करणेबाबत ऑल इंडिया इन्स्टीटयुट यांना थेट पध्दतीने कामकाज देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४३ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०३/०४/२०१८

सुचक : मा.सोनाली गव्हाणे अनुमोदक : मा.चंदा लोखंडे

संदर्भ : मा.सोनाली गव्हाणे, मा.चंदा लोखंडे यांचा प्रस्ताव –

महाराष्ट्र राज्य शासन हातमाग सहकारी महासंघ मर्यादित शासनाच्या दर करानुसार लाभार्थी महिला व महिला बचत गटाच्या रोज वापरासाठी संच उपलब्ध करुन देणेबाबत पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिला व बालकल्याण योजने मार्फत लाभार्थी महिला व महिला बचत गटांना रोज वापरासाठी दोन टॉवेल, दोन नॅपकीन, दोन चादर, एक ब्लॅंकेट इ.संच उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच प्रत्येक महिलेस पंचवीस कापडी पिशव्या उपलब्ध करुन देणेबाबत तसेच राज्य सरकारने प्लास्टीक बंदी घातली असून त्यासाठी सर्व सामान्यांनी पुढाकार घ्यायला हवा त्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचाही मोठा हातभार लागेल या दृष्टीकोनातून पिंपरी चिंचवड मधील प्रत्येक महिलेस पंचवीस लहान व मोठया साईजच्या कापडी पिशव्या उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच अखिल भारतीय स्थानिक संस्था यांच्या मार्फत महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ प्रशिक्षण रद्द करुन त्या ऐवजी महिलांच्या व्यावसायाला चालना देण्यासाठी अर्थसहाय्य करणेस मान्यता देणेत येत आहे. (उदा.लॉन्ड्री, ब्युटीपार्लर, भाजी दुकान, गाद्या कुशन कव्हर इ.)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( सुनिता हेमंत तापकीर )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१६५/२०१८
दिनांक : ०४/०४/२०१८

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.